/

क्रेद्रशासनाच्या अपंग व्यक्ती (समानसंधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम,1995 च्या खाली अपंगांसाठी सुयोग्य पदे निश्चित करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,माहिती तंत्रज्ञान संचालनालय

शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती-04/46 /39/02

मंत्रालय, मुंबई 400 032

दिनांक: 20 जानेवारी, 2011

वाचा:-1) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम,1995

2) शासन परिपत्रक क्र.मातंसं/नस्ती 04/460/39, दि. 10.2.2009

3) शासन परिपत्रक क्र.सा.न्या.व वि.स.वि. क्र. न्यायाप्र 2009/प्र.क्र.5/सुधार-3, दि. 3 ऑगस्ट 2010

**प्रस्तावना:-**

अपंग व्यक्ती (समानसंधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम,1995 या कायद्यान्वये अपंगांच्या सर्वांगिण विकासासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासन सेवेत 3% पदे आरक्षित करण्याची तरतूद आहे. सरळसेवा भरतीच्या पदांवर अपंगांना आरक्षण विहित करणे/सुट देणे संदर्भात याचिका क्र. 129/03 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार व पुर्नरचित तज्ञ समितीने केलेल्या सुधारणानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील माहिती तंत्रज्ञान संचलनालय आणि विज्ञान व तंत्रज्ञान कक्ष यांच्या आस्थापने वरील सरळसेवेने भरावयाच्या पदांसाठी संदर्भ क्र. 2 अन्वये अपंगां साठी पदे आरक्षीत करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. आता अपंग व्यक्तींसाठी आरक्षणा संदर्भात मा. उच्च न्यायालयाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अपंगांसाठी शासकीय / निम शासकीय सेवेतील आरक्षित पदे सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाने संदर्भ क्र. 3 अन्वये केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती अधिनियम, 1995 मधील तरतुदीस अनुसरुन त्यांच्या अखत्यारितील आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे निश्चित केलेली आहेत. केंद्र शासनाच्या या सुधारीत आदेशानुसार राज्य शासनाच्या अखत्यारितील शासकीय व निम शासकीय आस्थापनेवरील जी पदे समकक्ष आहेत ती पदे संबंधित विभागांनी अपंगांसाठी निश्चित करण्याबाबत सूचना केली आहे.

2. त्यास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील माहिती तंत्रज्ञान संचलनालय आणि विज्ञान व तंत्रज्ञान कक्ष या आस्थापनेवरील सरळसेवेने भरण्यात येणा-या कक्ष अधिकारी (तांत्रिक),सहाय्यक(तांत्रिक), वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी व कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी पदांकरिता अपंगांसाठी आरक्षण निश्चित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

संदर्भाधीन क्र. 2 येथील दि.10/2/2009 चा शासन निर्णय अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत.

2. केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती अधिनियम, 1995 मधील तरतुदीनुसार शासन अधिसूचना 16-70/2004DD III दि. 18.1.2007, दि. 15.3.2007 व दि. 22.3.2007 मधील जी पदे अपंग व्यक्तींसाठी आरक्षण देण्यासाठी निश्चित केलेली आहेत त्या पदांशी तुलना करुन सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील माहिती तंत्रज्ञान संचलनालय आणि विज्ञान व तंत्रज्ञान कक्ष या आस्थापनेवरील सरळसेवेने भरण्यात येणा-या कक्ष अधिकारी (तांत्रिक),सहाय्यक(तांत्रिक), वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी व कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी पदांकरिता अपंगांसाठी आरक्षण निश्चित करण्यात येत आहे.त्याचा तपशील सोबत जोडलेल्या परिशिष्ट -अ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

3. अपंग व्यक्ती (समानसंधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, 1995 या अधिनियमातील कलम 32 व 33 अनुसार सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील माहिती तंत्रज्ञान संचलनालय आणि विज्ञान व तंत्रज्ञान कक्ष या आस्थापने वरील या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" मधे नमुद केलेल्या पदांना सरळसेवा भरतीमध्ये किमान 40% अपंगत्व असलेल्या अपंग व्यक्तींसाठी प्रत्येकी 1% याप्रमाणे 3% आरक्षण लागू राहील.

4. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक क्रमांक 201110120164031001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

( सु. ह. जाधव )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई

विज्ञान व तंत्रज्ञान कक्ष, मंत्रालय, मुंबई

* महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (* पत्राने),

संचालक, सेवायोजन कार्यालय, मुंबई

सामान्य प्रशासन विभाग, कार्या-16-अ, कार्या- 19, मंत्रालय, मुंबई

सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग / कार्यासन सुधार-3,मुंबई

निवड नस्ती (कार्या-39)

परिशिष्ट - 'अ'

-: अपंग व्यक्तीसाठी पद निश्चिती :-

सामान्य प्रशासन विभाग/ कार्या-३९, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

शासन निर्णय क्रमांक: मातंस/नस्ती ०४/४६०/३९/०२ दिनांक २० जानेवारी, २०११

| क्र. | पदनाम | शारिरीक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा संवर्ग | पदाची कर्तव्य व जबाबदा-या |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी | ST, BN, SE, W, MF | OL BL OA | विज्ञान व तंत्रज्ञान विषयक प्रस्तावाची छाननी करणे |
| २ | कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी | ST, BN, SE, W, MF | OL BL OA | विज्ञान व तंत्रज्ञान विषयक प्रस्तावाची छाननी करणे |
| ३ | कक्ष अधिकारी (तांत्रिक) | S, RW,SE,MW,C | OL,OA,BL,LV,HH | संगणकीकरण व माहिती तंत्राज्ञान विषयक प्रकरणांची तांत्रिक दृष्टीकोनातून छाननी करणे |
| ४ | सहायक (तांत्रिक) | S,C,W,SE,RW,ST | OL,OA,BL,LV,HH | संगणकीकरण व माहिती तंत्राज्ञान विषयक प्रकरणांची तांत्रिक दृष्टीकोनातून छाननी करणे |

**ABBREVIATIONS USED: S=Sitting, BN=Bending, SE=Seeing, RW=Reading & Writing, C=Communication MF=Manipulation by Fingers, PP=Pulling & Pushing, L=Lifting, KC=Kneeling & Croutching, ST=Standing, W=Walking, BLA=Both Legs & Arms, BA=Both Arms, OL=One Leg, BL=Both Leg, OA=One Arm,OAL=One Arm and One Leg, B=Bind, LV=Low Vision, H=Hearing, MW=Muscular Weakness**

**OH=Orthopaedically Handicapped, CP= Cerebral Palsy, LC= Leprosy Cured, VH= Visually Handicapped, HH=Hearing Handicapped**